करोना 2020/सूचनां/आदेश क्र. Le

महाराष्ट्र शासन

जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी यांचे कार्यालय रायगड-अलिबाग
दुरध्वनी क्रमांक :- 02141-222118/222097/222001 फॅक्स क्रमांक: 02141-222025/227451
Email : collector_raigad@maharshtra.gov.in Email dcraigad@gmail.com

---

क्र.साशा/कार्या-1/ब-5/आ.व्य./करोनाविषाणू/प्रतिबंधात्मक उपाययोजना/2020 दि. 22/03/2020

वाचले:- 1) आपत्ती व्यवस्थापन अधिनियम-2005
2) महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग यांचेकडील अधिसूचनां क्र.करोना 2020/प्र.क्र.58/ आरोग्य 5 दि.13/03/2020
3) महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग यांचेकडील साथरोग अधिनियम, 1897 ची नियमावली दि.14/03/2020
4) साथ रोग अधिनियम 1897
5) मुख्य कार्यकारी अधिकारी, रायगड जिल्हा परिषद यांचेकडील आदेश जा.क्र.राजिप/साप्रवि/ नियोजन / 366/2010, दि.14/03/2020.

---

## आदेश

ज्याअर्थी, आपत्ती व्यवस्थापन कायदा 2005 मधील 25 अन्वये जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाची स्थापना करण्यात आलेली आहे. व त्यातील पोट कलम 2 (अ) नुसार जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी हे उक्त प्राधिकरणाचे पदसिध्द अध्यक्ष आहेत.

शासनाने करोना विषाणूचा (COVID-19) प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा 1897 दि.13/03/2020 लागू करण्यात आलेला आहे. त्याबाबतची उपोद्घातातील अ.क्र.2 कडील अधिसूचनां लागू करण्यात आलेली आहे. चीन,इटली, दक्षिण कोरिया, स्पेन, इराण, फ्रान्स, दुबई, या करोना विषाणू बाधित देशातून भारतात येणाऱ्या प्रवाशांना Quarantine Cell मध्ये त्यांचा Incubation Period संपेपर्यंत निगराणीखाली ठेवण्यात यावे, अशा सूचनां दिलेल्या आहेत.

आणि ज्याअर्थी, करोना विषाणू आजाराची लक्षणे ही मुख्यत्वे श्वसन संस्थेशी निगडीत आहेत व ताप, खोकला, श्वास घ्यायला त्रास होणे, निमोनिया, काही वेळा मूत्रपिंड निकामी होणे अशी लक्षणे मुख्यत्वेकरून असून सर्वसाधारणपणे हा आजार हवे वाटे शिंकण्या खोकल्यातून जे थेंब बाहेर पडतात त्यादवारे पसरतो. त्यामुळे शासनाने सदर विषाणूंच्या प्रसारावर आळा घालण्यासाठी विविध प्रतिबंधात्मक उपाय जारी केलेले आहेत.

त्यानुषंगाने जिल्हयात परदेशी प्रवास करुन येणाऱ्या प्रवाशांची माहिती तहसिल कार्यालयास देणे. प्रवाशांच्या घरी अलगीकरण (Home Quarantine) मध्ये असलेल्या प्रवाशांवर निगराणी ठेवणे, त्यांचे वेळोवेळी Screning करून घेणे, परदेशाहून प्रवास करुन आलेल्या प्रवाशाच्या संपर्कात आलेले व्यक्तींची माहिती देणे. करोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी स्थानिक पातळीवर जनजागृती करणे, परदेशी प्रवास करून येणाऱ्या व्यक्तीस कोरोना संसर्गाची लक्षणे असल्यास तात्काळ वैदयकिय पथकास कळविणे इ.कामकाज करण्यासाठी व **नागरी व ग्रामीण क्षेत्रामधून यासंबंधी माहिती संकलित करण्यासाठी खालील प्रमाणे ग्रामस्तरीय व नगरस्तरीय करोना संसर्ग नियंत्रण पथक स्थापित** करण्याचे आदेश देण्यात येत आहेत. सर्व पथकातील सदस्यांनी वेळोवेळी त्यांचेकडील अधिकृत माहिती तहसिलदार/ गटविकास अधिकारी व मुख्याधिकारी कार्यालयास द्यावी.

| नोडल अधिकारी | पथकातील सदस्य | पथकाची जबाबदारी |
|---|---|---|
| म.न.पा. आयुक्त / गटविकास अधिकारी / मुख्याधिकारी | **करोना संसर्ग नियंत्रण पथक**<br>**पथक प्रमुख**:- वॉर्ड ऑफिसर / तलाठी/ ग्रामसेवक /मुख्याध्यापक<br>**पक्षकाचे सचिव**:- सर्व संबंधित शिक्षक व कृषी सहायक | • दिनांक 10 मार्च, 2020 नंतर परदेशातून प्रवास करुन गावात/वार्डमध्ये आलेल्या व्यक्तींची माहिती तत्काळ संबंधित तहसिदार किवा मुखाधिकारी कार्यालयास खालील |

| | | |
|---|---|---|
| | **पथकाचे सदस्य**:-<br>नगरपालिका कर्मचारी, आरोग्य सेवक, ग्रामस्तरावरील सर्व सरकारी अधिकारी/ कर्मचारी, शिक्षक, पोलीस पाटील, अंगणवाडी मदतनिस, आशा कार्यकर्ती, कोतवाल, पोलीस जमादार.<br>(नाव व पदनामासह पथक स्थापन करण्यात यावे) | नमून्यात कळवावी.<br>➢ परदेशातून भारतात येणाऱ्या नागरीकांची नावे व वय :-<br>➢ परदेशातून भारतात आल्याची तारीख<br>➢ परदेशातील कोणकोणत्या देशातून प्रवास केला आहे त्या देशांची नावे:-<br>➢ मूळ रहिवासी पत्ता :-<br>➢ तालुका व जिल्हा :-<br>➢ दुरध्वनी/भ्रमणध्वनी क्रमांक:-<br>➢ ताप व खोकला आहे काय?:-<br>➢ घरामध्ये अलगिकरणाचा (Home Quarantine) शिक्का हातावर मारला आहे काय?:-<br>• अशा प्रवाशांना घरी अलगीकरण (Home Quarantine) केले आहे व त्यांचे हातावर शिक्का मारला आहे काय याची खातरजमा करणे. नसल्यास तात्काळ मुख्याधिकारी / तहसिल कार्यालयास कळविणे.<br>• 60 वर्षांवरील परदेशातून आलेले नागरिकांचे शासकीय अलगिकरण केंद्रात (Institutonal Quarnatine) केले आहे काय याची खात्री करणे.<br>• अलगिकरण केलेल्या व्यक्तींची वेळोवेळी वैदयकिय तपासणी होते आहे काय याबाबत माहिती घेणे व वैद्यकिय पथकाकडून तपासणी करून घेणे.<br>• अशा व्यक्तिमध्ये किंवा गावातील अथवा वॉर्डातील व्यक्तींना करोना संसर्गाची लक्षणे आहेत काय? असल्यास संबंधीत वैदयकिय अधिकाऱ्यास तात्काळ कळवावे.<br>• गावातील/वॉर्डातील व्यक्तींना करोना संसर्गाची लक्षणे आढळलेल्या व्यक्तींच्या संपर्कात किती लोक आले त्यांची नावे मुख्याधिकारी/तहसिल कार्यालयास कळविणे व त्यांची वैदयकिय पथकाकडून तपासणी करून त्यांना काही लक्षणे आहेत काय? यावर लक्ष ठेवणे व वेळोवेळी वैद्यकिय पथकास कळवणे.<br>• घरीच अलगीकरणासाठी ठेवलेले नागरिक (Home Quarnatine) 100% अलगिकरणाच्या प्रक्रियेचे पालन करतात किंवा कसे? यावर निगराणी ठेवणे. त्यांच्या घराबाहेर अलगिकरणाचा फलक लावणे व तारीख |

| | | |
|---|---|---|
| | | लिहीणे. पालन करत नसल्यास तहसिल कार्यालय व पोलीस यांना कळविणे व पुढील उपाय योजना करणे.<br>• सदर कार्य पार पाडत असतांना यथास्थिती सन्माननीय लोकप्रतिनिधी जसे की, सरपंच, गणाचे सदस्य, गटाचे सदस्य, नगरसेवक, नगराध्यक्ष, जिल्हा परिषद उपाध्यक्ष, जिल्हा परिषद अध्यक्ष व इतर पदाधिकारी, राशन दुकानदार व तंटामुक्ती अध्यक्ष यांना सहकार्य करण्यासाठी आवाहन करावे व त्यांची मदत घ्यावी.<br>• शहरातून अथवा बाहेर गावातून गावामध्ये येणाऱ्या नागरीकांची नोंद गामपंचायतीत नियमितपणे घेण्यात यावी व गाव पातळीवरील कर्मचारी यांनी सदरची माहिती नियमितपणे दैनंदिन तालुका नियंत्रण कक्षात द्यावी.<br>• ग्रामपंचायत स्तरावर स्वच्छता ठेवणे व घनकचरा साठणार नाही याची दक्षता घेण्याचे नियोजन करावे.<br>• ग्राम पातळीवर आपल्या अधिनस्त आरोग्य केंद्रामार्फत करोना विषाणुचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी काय उपाययोजना करता येतील यांचे प्रबोधन करून ग्राम स्तरावर जनजागृती करावी.<br>• तालुका स्तरावरील वैदयकिय अधिकारी मुख्यालयी राहतात किंवा कसे? याचा दैनंदिन अहवाल सादर करणे.<br>• तालुक्यातील सर्व आरोग्य केंद्रात वैद्यकिय अधिकारी व कर्मचारी 24x7 तास उपस्थित असलेबाबतचा दैनंदिन अहवाल देणे. शासनाकडून वेळोवेळी मागविण्यात येणाऱ्या कोरोना विषाणू बाबतच्या सर्व प्रकारची माहिती तालुका स्तरावरील नियंत्रण कक्षाकडून प्राप्त करून घ्यावी व ती ग्रामस्थांना दयावी.<br>• मुख्य कार्यकारी अधिकारी यांना तसेच गटविकास अधिकारी/जिल्हा परिषद नोडल ऑफिसर यांना दैनंदिन अहवाल सादर करावा. |

महानगरपालिका आयुक्त/सर्व गटविकास अधिकारी/मुख्याधिकारी यांचेमार्फत आपआपल्या अधिकार क्षेत्रात कोरोना संसर्ग नियंत्रण पथकांची स्थापना करावी व त्याचे ग्रामपातळीवरील किंवा वॉर्ड

स्तरावरील नावानिशी आदेश परित करावेत. सदर आदेश श्रीमती शितल पुंड, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं.), रायगड जिल्हा परिषद  व श्री.महेश चौधरी, जिल्हा प्रशासन अधिकारी (नगरपालिका प्रशासन शाखा) यांच्या मार्फत या कार्यालयास दोन दिवसात सादर करावे. श्रीमती शितल पुंड व श्री.महेश चौधरी यांनी दर सोमवारी कार्यालयनिहाय अहवाल या कार्यालयात श्री.रविंद्र मठपती, उपजिल्हाधिकारी (रो.ह.यो.) यांचेकडे सादर करावा. श्री.मठपती यांनी वेळोवेळी समनवय ठेवून सदर कामकाज पार पाडावे व वेळोवेळी मा.जिल्हाधिकारी यांचेकडे अहवाल सादर करावा.

या आदेशांन्वये स्थापन केलेली सर्व पथके ही आपले कार्य काटेकोरपणे पार पाडत आहेत किंवा कसे? याबाबत उपविभागीय अधिकारी/तहसिलदार यांनी स्वत: लक्ष पुरवावे. सदर पथकांवर संबंधीत उपविभागीय अधिकारी यांनी संबंधीत गटविकास अधिकारी/मुख्याधिकारी यांचे मार्फत समन्वय साधावा. सदर कामकाज करत असतांना समन्वयासाठी सर्वांनी आपला भ्रमणध्वनी नेहमी चालू ठेवावा व आपल्या मुख्यालयी थांबावे.

याबाबत हयगय अथवा हलगर्जीपणा करु नये, असे केल्याचे निर्दशनास आल्यास संबंधिताविरुध्द आपत्ती व्यवस्थापन अधिनियम 2005 मधील कलम 56 तसेच भारतीय दंड संहिता, 1960 चे कलम 188 अन्वये कारवाई करण्यात येईल, याची गांभीर्याने नोंद घ्यावी.

सदर आदेशास तात्काळ अंमल देण्यात यावा.

जिल्हाधिकारी रायगड-अलिबाग
Collector Raigad-Alibag

(निधी चौधरी)
जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी
रायगड-अलिबाग

प्रति,
पोलीस उपायुक्त झोन - II
उपविभागीय अधिकारी (सर्व) ---------------
आयुक्त, पनवेल महानगरपालिका, पनवेल
उपमुख्य कार्यकारी अधिकारी(ग्रा.पं.),रा.जि.प.अलिबाग
तहसिलदार (सर्व) ----------------------
जिल्हा प्रशासन अधिकारी (नगरपालिका प्रशासन शाखा)
मुख्याधिकारी, नगरपरिषद/नगरपंचायत (सर्व)
गटविकास अधिकारी, पंचायत समिती (सर्व)

प्रत माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीस्तव
1. मा.विभागीय आयुक्त, कोंकण विभाग, कोंकण भवन, नवी मुंबई
2. मुख्य कार्यकारी अधिकारी, रायगड जिल्हा परिषद, अलिबाग
3. जिल्हा पोलीस अधिक्षक,रायगड.
4. जिल्हा पूरवठा अधिकारी, रायगड
5. जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी, रायगड
6. जिल्हाशिक्षणाधिकारी, प्राथ./माध्य., रा.जि.प., अलिबाग
7. तालुका आरोग्य अधिकारी (सर्व)

(निधी चौधरी)
जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी
रायगड-अलिबाग